प्रेसनोट **दिनांक २२/०९/२०२५**

अंजुर खाडीच्या बेटावर अवैध रित्या सुरू असलेली गावठी दारू बनविणारी हातभट्टया उध्दवस्त करून ४०,२२,०००/— एकूण रूपये किंमतीचा मुद्देमाल नष्ट .

मा पोलीस आयुक्त सो, ठाणे शहर यांनी पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध गावठी हातभटट्री चालु असल्यास त्यावर कारवाई करण्याच्या सुचना केली होती. त्याप्रमाणे दिनांक २१/०९/२०२५ रोजी सपोनिरी महेंद्र पाटील यांनी गुप्त बातमीदारा मार्फत ''अंजुर खाडीच्या बेटावर काही इसम गावठी दारू बनविण्याकरीता साधणे जमा करून अवैध गावठी हातभट्टी दारू तयार करीत आहेत'' अशी माहिती प्राप्त केली. सदर माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी यांनी सदर माहितीची शहाननिशा करून कारवाई करण्या बाबत मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे ड्रोनच्या माध्यमातून गावठी दारू बनविणाऱ्या हातभट्टया हया खाडी झुडपामध्ये लपुन छपुन चालू असल्याचे ठिकाणे निश्चित केली. तसेच सदर ठिकाणी बोटीच्या सहाय्याने चिखला मधून खडतर मार्गाने नारपोली पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व तपास पथकाचे अंमलदार यांनी जावून खाडी किनाऱ्यावर हातभट्टी चालविणारे आरोपीत नामे १) जगन दादु पाटील, २) अविनाश पाटील, ३) जगदीश पाटील, ४) नरेंद्र पाटील, ५) विशाल पाटील, ६) मिलींद पाटील यांच्या सहा गावठी दारूच्या भट्टया आढळून आल्या तसेच सदर ठिकाणी गावठी दारू बनविण्याकरीता लागनारे रसायन (वॉश) भरलेले प्लॉस्टीकचे ड्रम, तसेच गावठी हातभट्टीची दारू एकूण ४०,२२,०००/— रूपये किमंतीचे हातभट्टी दारू बनविण्या करीता लागणारा माल जागीच नष्ट करून आरोपी विरूध्द नारपोली पोलीस ठाणे गु.र.क्र १०९५/२०२५ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५(फ),(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा श्री आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा श्री डॉ ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर, मा श्री विनायक देशमुख, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग ठाणे, मा. श्री. शशिकांत बोराटे, पोलीस उप आयुक्त, परि २, भिवंडी , मा.श्री. सचिन सांगळे, सहायक पेालीस आयुक्त, पुर्व विभाग, भिवंडी यांच्या मार्गदर्शनाखाली नारपोली पेालीस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय कादबाने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. ज्ञानेश्वर कदम सहा.पो.निरी/ महेंद्र पाटील, पो. उप निरी. आकाश पवार व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार पो.हवा/३४७३ सस्कर, पो.हवा/५१९३ हुंडेकरी, पोहवा/४६५७ बी बी चव्हाण, पो.हवा/३८४९ म्हात्रे, पो.हवा/१४० गुंजाळ, पोना/२८८७ मोहिते, पोशि/८४०६ लोंढे, पोशि/८३७६ महाले यांनी पार पाडली आहे.

